# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## जाहिर सूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१८/स/२६३८ दिनांक: १६ फेब्रुवारी २०१८

## अधिसभेवर सदस्यांचे नामनिर्देशनासंदर्भात विद्यापीठ क्षेत्रातील नगरपालिका आणि जिल्हा परिषदांचा चक्रक्रम निश्चितीची सोडत

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २८(२)(म) नुसार एक वर्षाच्या पदावधीकरिता आळीपाळीने नगरपालिकेचा किंवा महानगरपालिकेचा एक सदस्य मा. कुलगुरूंद्वारा आणि कलम २८(२)(य) नुसार एक वर्षाच्या कालावधीसाठी आळीपाळीने विद्यापीठ क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण समित्यांचा एक प्रतिनिधी शिक्षण समितीद्वारा नामनिर्देशित करावयाचा आहे (नागपूर, भंडारा, गोंदिया, व वर्धा). विद्यापीठ निदेश क्रमांक ४/२०१८ मधील तरतुदीनुसार विद्यापीठ क्षेत्रात नागपूर महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका असल्यामुळे वरील नामनिर्देशनाबाबत नागपूर महानगरपालिकेचा प्रथमक्रम निश्चित करण्यात आला आहे व विद्यापीठ क्षेत्रातील उर्वरित नगरपालिकांचा आणि जिल्हापरिषदांचा विद्यापीठ निदेश क्रमांक ३/२०१८ व ४/२०१८ मधील तरतुदीनुसार चिठ्ठ्या टाकून सोडतीने चक्रक्रम निश्चित करण्यासाठी मा. कुलगुरूंनी **शनिवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात सभा आयोजित केली आहे.**

**संबंधित इच्छूक व्यक्ति या सभेला उपस्थित राहू शकतील.**

**मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये**

**(पुरणचंद्र मेश्राम)**

**कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे प्रमुख, संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व विद्यापीठ परिसंस्थांचे सचालक.

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित, स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्थांचे सर्व प्राचार्य/संचालक.

३. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)

उपकुलसचिव (सा.प्र.)(अ.प्र)

व स.नि.नि. अधिकारी